उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनालय व इतर कार्यालयातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१७-१८ या वर्षापासून कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याकरिता प्राथमिक परिरक्षक व अतिरिक्त परिरक्षक यांच्या नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-१११९/प्र.क्र.१/१८/तांशि-६
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २३ एप्रिल, २०१८

<u>वाचा :</u>- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/१३, दि. १५ डिसेंबर, २०१७.

शासन निर्णय :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दि. १५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकानुसार सन २०१७-१८ या वर्षापासून गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविणे प्रस्तावित आहे.

२. सदर दि. १५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद -५ मध्ये नमूद केल्यानुसार संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी **संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना प्राथमिक परिरक्षक (Primary Custodian) म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

३. कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कला महाविद्यालयांकरिता त्या कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे Organization Unit (OU) निश्चित करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	प्राथमिक परिरक्षक	अतिरिक्त परिरक्षक	Organization Unit (OU)
१	संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
			निरिक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई.
			सहायक निरिक्षक, चित्रकला व शिल्प नागपूर विभागीय कार्यालय.

			सहायक निरिक्षक, चित्रकला व शिल्प औरंगाबाद विभागीय कार्यालय.
		अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.	अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
		अधिष्ठाता, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई.	अधिष्ठाता, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई.
		अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.	अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
		अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.	अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.

४. तसेच कला संचालनालयातील तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील निरिक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई,सहायक निरिक्षक, चित्रकला व शिल्प नागपूर व औरंगाबाद विभागीय कार्यालय या कार्यालयांसाठी, त्या कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी **उप संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना अतिरिक्त परिरक्षक (Alternate Custodian) म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

५. कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कला महाविद्यालयांकरिता त्या कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी संबंधित महाविद्यालयांचे **अधिष्ठाता** यांना अतिरिक्त परिरक्षक म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

६. कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी संदर्भाधीन दि. १५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकामधील सूचना विचारात घेऊन, कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची परिशिष्ट " ड " मधील प्रपत्रात अद्यावत माहिती (EMD (Employee Master Data)) उपलब्ध करुन देण्याबाबत समक्रमांकित दि. १५.०१.२०१८ च्या पत्रान्वये कला संचालनालयास कळविण्यात आले आहे. अतिरिक्त परिरक्षकांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची परिशिष्ट " ड " मधील प्रपत्रात अद्यावत माहिती Excel Format मध्ये तयार करावी. EMD मध्ये नमूद करण्यात आलेला मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडलेला असावा, जेणेकरुन महापार प्रणालीमध्ये ई साईन या सुविधेचा वापर करणे सुलभ होईल. अतिरिक्त परिरक्षक आवश्यकतेनुसार त्यांच्या नियंत्रणाखालील एक किंवा अधिक पार व्यवस्थापक (Par Manager) म्हणून घोषित करु शकतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०४२३१४५७४०४६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bd66db73425a9730e4074ae475eb26788ae32a45d13639a02fcf2ffbd43272ff, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2018.04.23 15:01:34 +05'30'

(का. रा. पिळणकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. प्र. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. निरिक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई ,
३. अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
४. अधिष्ठाता, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर / औरंगाबाद.
६. सहायक निरिक्षक, चित्रकला व शिल्प कार्यालय, नागपूर व औरंगाबाद.
७. कक्ष अधिकारी (का-१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती.